रे. दिवाणी मुकदमा नं.२५८/२०१५.

निशाणी ५ वरील आदेश
( दिनांक १०/०९/२०१५ रोजी पारीत )

१. प्रस्तुतचा अर्ज वादीनी दिवाणी प्रक्रिया संहिता आर्डर ३९ रुल १ व २ प्रमाणे प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेशाकरीता केलेला आहे.

२. वादीनी कथन केले की, वाद मिळकत ही मुळची कैलासवासी म्हाळाप्पा उर्फ म्हालाप्पा बिरा बंडगर यांची स्वकष्टार्जित खरेदी मालकी वहिवाटीची होती व आहे. वादींनी पुढे कथन केले की, सदर मिळकतीमध्ये म्हाळाप्पा बिरा बंडगर हे त्यांच्या हयातीमध्ये वादीबरोबर रहात होते. म्हाळाप्पा बंडगर यांची पत्नी व वादी क्रं. २ यांच्या सासूबाई गोकुळाबाई गणपती बंडगर हया दोघी सख्या बहीणी होत्या व त्या दोघींचे एकमेकांवर प्रेम असल्यामुळे त्यांचे व कै. म्हाळाप्पा बंडगर यांचे एकत्रात उठबस राहणे होते. म्हाळाप्पा बंडगर यांची पत्नी हौसाबाई ही १९/०२/२०१४ रोजी मयत झाली व त्यानंतर कै. म्हाळाप्पा बंडगर हे दिनांक ०७/०१/२०१५ रोजी वृध्दापकाळाने दावा मिळकतीत राहत असताना मयत झाले. कै. म्हाळाप्पा बंडगर यांचे मृत्यूपश्चात त्यांना प्रथमश्रेणीतील अन्य कोणीही वारस नव्हते.

३. वादीने कथन केले की, वादी यांनी त्यांचा वृध्दापकाळातील सांभाळ केला. त्यामुळे ते वादी यांना मुली मानून त्यांचेवर प्रेम करत होते व सर्व जण एकत्रात दावा मिळकतीत राहणेस होते. कै. म्हाळाप्पा बडंगर यांनी दिनांक ३०/०३/२०११ रोजी दावा मिळकत वादी यांना देण्याची इच्छा व्यक्त केली व त्याप्रमाणे त्यांनी मृत्यूपत्राचा लेख दिनांक ३०/०३/२०११ रोजी साक्षीदारांचे समक्ष करुन ठेवला. त्यामध्ये त्यांचे पश्चात दावा मिळकत उभयता वादींना निम्या निम्या हिश्याने मिळणेची इच्छा मृत्यूपत्राने व्यक्त करुन मृत्यूपत्र करुन ठेवले. वादीने पुढे कथन केले की, म्हाळाप्पा बंडगर हे मयत झाल्यानंतर सदर दावा मिळकत ही वादी यांच्या प्रत्यक्ष मालकी व कब्जेवहिवाटीत आली व वादी

हे सदर वाद मिळकतीचे कायदेशीर मालक या नात्याने दावा मिळकीचा उपभोग घेत आहेत.

४. वादींनी पुढे कथन केले की, प्रतिवादी क्रं. १ व २ हे म्हाळाप्पा यांचे बंधू असून म्हाळाप्पा बंडगर यांचेकडे त्यांच्या हयातीमध्ये कधीही येणेजाणे नव्हते. तसेच त्यांची कधीही विचारपूस अथवा सेवाशुश्रुषा केली नाही. वादींनी पुढे कथन केले की, प्रतिवादी हे गैरफायदा घेवून वाद मिळकतीमध्ये गैरमालकीने घुसण्याच्या प्रयत्न करीत आहेत. तसेच वादींना दावा मिळकतीमधून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादींनी पुढे कथन केले की, दिनांक ३०/०३/२०११ च्या मृत्यूपत्राने वादींना दावा मिळकत मालकी हक्कात मिळालेली असून ते दावा मिळकतीमध्ये शांततामय कब्जेवहिवाटीस आहेत. वादीने पुढे कथन केले की, प्रतिवादी क्रं. १ व २ यांचा कोणताही कायदेशीर अधिकार नसताना वादींवरती दबाव आणून वादींना दावा मिळकतीतून हसकावून लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादींना जर हसकावून लावल्यास वादींचे कुटूंब उघडयावर पडणार आहे. वादींनी पुढे कथन केले की, वादींनी प्रतिवादींच्या त्रासामुळे पोलिस स्टेशनला तक्रार देखील केली परंतु पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे वादींनी न्यायनिर्णय होईपर्यंत तुर्तातुर्त ताकीदीची दाद मागितलेली आहे. वादीने पुढे कथन केले की, सदर मृत्यूपत्रानुसार वादींची दावा मिळकतीचे रेकॉर्ड सदरी नोंद झालेली आहे. वादींनी निशाणी ५ मंजूर होण्यास विनंती केली आहे.

५. प्रतिवादींनी निशाणी २९ कडे म्हणणे दाखल केले असून त्यामध्ये वादीची संपूर्ण कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादींनी कथन केले की, म्हाळाप्पा बंडगर हे वादी यांच्यासोबत कधीही राहणेस नव्हते. प्रतिवादींनी ही बाब मान्य केली आहे की, म्हाळाप्पा बंडगर यांची पत्नी व वादी क्रं. २ यांच्या सासूबाई गोकुळाबाई बंडगर हया सख्ख्या बहीणी होत्या. प्रतिवादीने पुढे कथन केले की, मयत म्हाळाप्पा बिरा बंडगर यांचे ते वारस आहेत. प्रतिवादींनी पुढे कथन केले

की, मयत म्हाळाप्पा बंडगर हे जिल्हा परीषद, सांगली येथे शिपाई या पदावर निवृत्त झाले असून त्यांना मासिक ८ ते १० हजार निवृत्ती वेतन मिळत होते. त्यामुळे वादीने त्यांच्यावर खर्च करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. प्रतिवादीने पुढे कथन केले की, वादीने बनावट मृत्यूपत्र तयार करुन नगर भूमापन अधिकारी यांच्या संगनमताने मयत म्हाळाप्पा बंडगर यांच्या मिळकत सदरी नावाची नोंद करुन घेतली आहे त्याबाबत प्रतिवादीनी मा.अधिक्षक, नगर भूमापन यांच्याकडे अपील दाखल केले आहे. प्रतिवादीनी पुढे कथन केले की, म्हाळाप्पा बंडगर यांनी त्यांचे हयातीत कोणतेही मृत्यूपत्र तयार केले नाही. प्रतिवादीनी पुढे कथन केले की, तथाकथीत मृत्यूपत्रात दोन ठिकाणी दिनांक ३०/०३/२०११ रोजी सदर मिळकती पैकी पुर्व बाजूचे काही क्षेत्र वादी क्रं. १ यांचे पती किसन रुपनर यास नोंद खरेदीपत्राने दिले असल्याने मयत म्हाळाप्पा बंडगरने वादी कथन करतात त्याप्रमाणे सदर मिळकतीचे तथाकथित मृत्युपत्र त्यांचे हक्कात करुन घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही. खरेदीपत्रानुसार मयत म्हाळाप्पा बंडगर यांनी दिनांक ३०/०७/२०११ रोजीचा खरेदी दिली मिळकत संदर्भात चुक दुरुस्त दस्त करुन दिला असल्याचे रेकॉर्डवरुन दिसून येते. तथाकथीत मृत्यूपत्र पाहता मयत म्हाळाप्पा बंडगर यांच्या पश्चात लबाडीचे कथन करुन व पूर्वी घेतलेल्या स्टॅम्पवरती टंकलेखन करुन लबाडीचा दस्त केला असल्याचे स्पष्ट होते.

६. प्रतिवादीने पुढे कथन केले की, मृत्यूपत्राचे आधारे वादींना कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. प्रतिवादीने पुढे कथन केले की, तथाकथित मृत्यूपत्राच्या नोंदी संबंधी वादींनी जो अर्ज केला त्याबाबत या प्रतिवादींनी जी हरकत दिली तिचा विचार करता मा. नगरभूमापन अधिकारी यांनी त्याप्रमाणे तिची चौकशी करुन निर्णय देणे अपेक्षित असता तथाकथित मृत्यूपत्राने दि. २७/०४/२०१५ रोजी वादीचे नावाबाबतची नोंद मंजूर केली, त्या फेरफार नं. ३९४६ चा उतारा पाहता त्यामध्ये केलेल्या नोंदी हया कशा मनमानी व लबाडीच्या आहेत हे स्पष्ट होते. दिनांक २७/०४/२०१५ च्या पत्राने प्रतिवादी शंकर बिरा बंडगर यांना न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यास

कळविले. अशा स्थितीत वादी व त्यांचे साक्षीदार यांनी नमूद भूमापन अधिकारी यांच्याकडून वारस प्रमाणपत्र प्राप्त करुन दिनांक २७/०४/२०१५ च्या पत्राने प्रतिवादी शंकर बिरा बंडगर याला न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याबाबत कळविले. तरी देखील वादीने भुमापन अधिकारी यांचेशी संगनमत करुन तथाकथीत मृत्यूपत्रावरुन वादीच्या नावाची नोंद केली आहे.

७. प्रतिवादीने पुढे कथन केले की, म्हाळाप्पा बंडगर यांचा सांभाळ प्रतिवादी क्रं.१ यांचा मुलगा विष्णू शंकर बंडगर यानेच केलेला आहे. प्रतिवादीनी कथन केले की, वादी हे वाद मिळकतीत कधीही राहणेस नव्हते उलट वाद मिळकत ही प्रतिवादीच्या वहीवाटीस होती व आजही आहे. प्रतिवादीनी पूढे कथन केले की, प्रतिवादी हे वयोवृध्द असल्याचा गैरफायदा घेवून वादी हे प्रतिवादींना घरा बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादी हे बिन नोंद मृत्यूपत्राच्या आधारे हक्क दाखवित आहेत.

८. प्रतिवादीनी पुढे कथन केले की, म्हाळाप्पा बंडगर यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजी मृत्यू झाल्यानंतर प्रतिवादी हे त्यांचे कायदेशीर वारस असल्याने त्यांनी त्यांच्या नावाची नोंद सिटी सर्वे उता-यावर होण्यासाठी दिनांक १५/०३/२०१३ रोजी अर्ज केला परंतु त्यांना न्यायालयाकडून वारसा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी कळविले असता प्रतिवादीनी दुस-या दिवशी दिनांक २८/०४/२०१५ रोजी अर्ज केला. प्रतिवादीनी पुढे कथन केले की, दिनांक २७/०४/२०१५ रोजी नगर भुमापन अधिकारी यांनी वादींचे नाव लागणेचा फेरफार मंजूर केला आहे व त्याचा फेरफार क्रमांक ३९४६ असा आहे. प्रतिवादींना याबाबत कोणतीही नोटीस देण्यात आलेली नाही. प्रतिवादींनी पुढे कथन केले की, मृत्यूपत्र हे रजिष्टर नसल्याने ते वादींना शाबीत करणे बंधनकारक आहे. वादीचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे नुकसान होईल. वादी हे कोर्टासमोर स्वच्छ हाताने आलेले नाहीत. उलट तुर्तातुर्त आदेशाचा वादींचा अर्ज नामंजूर केल्यास वादींचे कोणत्याही प्रकारचे नुकसान

होणार नाही. त्यामुळे प्रतिवादींनी वादींचा तुर्तातुर्त ताकीदीचा मनाईचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

९. वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञाचा युक्तीवाद ऐकला.

१०. दावा, कैफियत, तुर्तातुर्त ताकीद अर्ज तसेच वादी व प्रतिवादी यांनी हजर केलेले कागदपत्र या बाबींचा विचार करता खालील मुद्दे अवलोकनार्थ आले असून मुद्दे, त्यांचे निष्कर्ष व त्याबाबतची कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस प्रथमदर्शनी केस असल्याचे वादींनी सिध्द केले काय ? | होय. |
| २. | प्रतिवादी यांना ताकीद न दिल्यास वादीचे पैशाच्या रुपाने भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे असे वादींनी सिध्द केले आहे का ? | होय. |
| ३. | न्यायाचा समतोल व सोयीची बाब वादींच्या बाजूने असल्याचे वादींनी सिध्द केले का? | होय. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रं. १ साठी-

११. वादींनी निशाणी ४ कडे कागदपत्रे हजर केली आहेत. वादींनी मालमत्ता पत्रक नि. ९, पोलिस स्टेशनला तक्रार दिलेल्या अर्जाची प्रत नि. ४/२, एम. एस. ई. बी. कडील बिल भरलेची पावती नि. ४/३ ते ४/, सांगली महानगरपालिकेकडे घरपट्टी भरलेली पावती नि. ४/७, मालमत्तेवरील नाव दाखल बदलाबाबत वादींना दिलेली समजची पावती नि. ४/८, दावा मिळकतीचे

फोटो नि. ४/९ ते ४/११, फोटोंचे बील नि.११, प्रतिवादी यांना दावा व तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जाची प्रत पाठविलेली पोस्टाची पोच नि.२०/१, वादी यांचे वकीलांनी आर्डर ३९ रुल ३ नुसार पुर्तता केल्याबाबतचे शपथपत्र नि. २०/२, म्हाळाप्पा बंडगर यांनी लिहून ठेवलेले मृत्यूपत्राची झैरॉक्स नि.२२/१, इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

१२. प्रतिवादी यांनी नि.३१ व ३४ कडे कागदपत्रे हजर केली आहेत. प्रतिवादींनी नगर भूमापन अधिकारी, सांगली यांचेकडे मृत्यूपत्राने नाव नोंद करणेसाठी दाखल केलेली सर्व कागदपत्रे नि.३१/१, नगर भूमापन अधिकारी यांनी प्रतिवादींना दिलेले पत्र नि. ३१/२, नगर भूमापन अधिकारी, सांगली यांनी मंजूर केलेला फेरफार नं. ३९४६ नि. ३१/३, हौसाबाई म्हाळाप्पा बंडगर यांचे मृत्यू प्रमाणपत्र नि. ३१/४, म्हाळाप्पा बिरा बंडगर यांचे मृत्यू प्रमाणपत्र नि. ३१/५, म्हाळाप्पा बिरा बंडगर यांची सही नमूद असलेचा जिल्हा परीषद सांगली कडील दाखला नि. ३१/६, अंगठयाचे नमुने असलेचा दाखला नि. ३१/७, मिळकत क्रं. ५६२४/१ चा उतारा नि. ३१/८, म्हाळाप्पा बिरा बंडगर यांचे सेव्हींग पासबुक नि. ३१/९ , नगर भूमापन अधिकारी यांचेकडे दाखल केलेल्या अर्जाची कार्यालयीन पोहोच नि. ३४/१, म्हाळाप्पा बिरा बंडगर यांचे नावे असलेले पाणी बील भरलेची पावती नि.३४/२ इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

१३. वादींचे वकीलांनी युक्तीवाद केला की, दावा मिळकत वादींचे कब्जेवहिवाटीत असल्याचे वादींनी दाखल केलेले फोटोग्राफवरुन दिसून येते. तसेच सदर दावा मिळकत ही वादींच्या नावे झाल्याचे निशाणी ९ वरुन स्पष्ट होते. वादींचे वकीलांनी युक्तीवाद केला की, वादी हे मयत म्हाळाप्पा बंडगर यांनी केलेल्या मृत्यूपत्रानुसार दावा मिळकत कब्जेवहिवाटीत आहेत. वादींनी सदर मृत्यूपत्र निशाणी २२/१ कडे हजर केले आहे.

१४. वादींच्या वकीलांनी खालील मा. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे हजर केलेले आहेत.

1. **Baban Anantrao Naik *Vs.Sou. Pramila Uttamrao Yenare & Anr, reported in* 2010(o) BCI 338**. It is held that at the time of determination of the application for temporary Injunction, the factum of possession would only be the relevant factor. Where the possession is lawful possession or not when be decided after the evidence is lead.

2. **Vithaldas Rama Lotlikar Vs. Jose Menino Godinho and others, reported in 1992(2) Bom. C.R. 254( Panji Bench)**. It is held that in cases for temporary injunction what really matters is not real title of strict ownership of property but instead it's possession which however must be shown by the petitioner as being linked to some sort of title.

3.**Vishnu Ramchandra Undage Vs. Ganapati Ramchandra Undage & others, reported in 2006(1) Bom.C.R.672.** Register will so made by Kolhapur, in respect of property situated in kolhapur, there is no need to obtain probate because Kolhapur, it is original Civil Jurisdiction of High Court.

१५. याउलट प्रतिवादींचे वकीलांनी युक्तीवाद केला की, वादींनी दाखल केलेले मृत्यूपत्र दिनांक ३०/०३/२०११ रोजीचे आहे. ते खोटे व बनावट आहे, तसेच ते नोंदणीकृत दस्त नाही. प्रतिवादींचे वकीलांनी युक्तीवाद केला की, वादीने भूमापन अधिकारी यांचेशी संगनमत करुन दावा मिळकतीवर त्यांचे नाव लावून घेतले आहे. प्रतिवादींचे वकीलांनी पुढे युक्तीवाद केला की, मृत्यूपत्रात

म्हाळाप्पा बंडगर यांनी त्यांची पत्नी मयत असल्याचे लिहलेले आहे. परंतु म्हाळाप्पाची पत्नी ही दिनांक १९/०२/२०१४ रोजी मयत झालेली आहे. तसेच म्हाळाप्पा बंडगर यांच्या मृत्यूपत्रावरील अंगठा, तसेच प्रतिवादींनी निशाणी ३१/५ ते ३१/७ कडे दाखल केले दस्तऐवजावर म्हाळाप्पा यांच्या अंगठयाचा नमुना हयामध्ये फरक असल्याचे दिसून येते. प्रतिवादींचे वकीलांनी युक्तीवाद केला की, मृत्यूपत्र हे खोटे व बनावट आहे व म्हाळाप्पा यांनी कोणतेही मृत्यूपत्र वादींचे नावे करुन दिलेले नाही. प्रतिवादींचे वकीलांनी युक्तीवाद केला की, वादी हे म्हाळाप्पा बंडगर यांच्याकडून खरेदी केलेल्या रुममध्ये रहात आहेत.

१६. दिवाणी प्रक्रिया संहिता आर्डर ३९ नुसार वादींनी त्यांच्या बाजूने प्रथमदर्शनी केस व न्यायाचा समोल व अपरिमित नुकसान हया बाबी सिध्द केल्या पाहिजेत. वादी हे दावा मिळकतीत कब्जेवहिवाटीस असल्याची बाब प्रतिवादीने नाकारलेली आहे. वादीने निशाणी ५ कडे मिळकतीचे उतारे, मालमत्ता पत्रक दाखल केले आहे. त्यामध्ये वादींचे नाव मिळकतीला धारक म्हणून लागले आहे. मयत म्हाळाप्पा बंडगर यांची पत्नी वादी क्रं. २ यांची सासू गोकुळाबाई बंडगर या सख्ख्या बहीणी असल्याची बाब वादादीत नाही. वादीने मृत्यूपत्राची झैरॉक्स प्रत निशाणी २२/१ कडे हजर केली आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, मयत म्हाळाप्पा बिरा बंडगर यांनी दावा मिळकत ही वादींच्या नावे करुन दिलेली आहे. वादींनी दावा मिळकतीचे फोटो हजर केले आहेत. त्यावरुन वादींचे ताब्यात दावा मिळकत असल्याचे स्पष्ट होते.

१७. वादीने व प्रतिवादीने दाखल कलेली कागदपत्रे पाहिली. वादीने नि.९ कडे दावा मिळकतीचे मालमत्ता पत्रक हजर केले आहे त्यावरुन वादी यांचे नाव धारक म्हणून लागलेचे दिसून येते. वादी यांचे कथन आहे की, ते दावा मिळकत कब्जेवहिवाटीत आहेत. प्रतिवादींचे देखील म्हणणे आहे की, प्रतिवादी दावा मिळकत कब्जेवहिवाटीत आहेत. प्रतिवादी यांनी दावा मिळकत कब्जेवहीवाटीत असलेबाबत कोणताही पुरावा आणलेला नाही. प्रतिवादीने

दाखल केलेला दस्त ऐवज पाहिले. प्रतिवादींचे वकीलांनी युक्तीवाद केला की, त्यांनी नगर भूमापन यांच्याकडे दावा मिळकतीस नाव लागणेसाठी अर्ज दिला असता त्यांना न्यायालयाकडून वारसा प्रमाणपत्र प्राप्त करणेसाठी तसे नगर भूमापन यांच्याकडून पत्र दिले. प्रतिवादींच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, परंतू त्याच दिवशी वादींचे नाव फेरफार नोंद वहीत नोंद घेण्यात आली. निशाणी ३१/३ कडील कागदपत्रे पाहिली असता परीरक्षण भूमापन यांनी मृत्यूपत्रा आधारे वादींची नावे त्यांच्या आदेशानुसार नोंद केलेली आहेत. प्रतिवादींचे कथन की, वादींनी बनावट व खोटया मृत्यूपत्राच्या आधारे दावा मिळकतीत नाव लावून घेतले आहे. प्रतिवादींचे म्हणणे की, मृत्यूपत्र व नि. ३१/५ ते ३१/७ कडे दाखल असलेले कागदपत्रामध्ये म्हाळाप्पा बंडगर यांचे अंगठयाचे ठस्यामध्ये फरक आहे. परंतु वादीचे वकीलांचे युक्तीवादाप्रमाणे वादी हे दावा मिळकतीत म्हाळाप्पा बंडगर सोबत राहत होते व ते दावा मिळकत कब्जेवहिवाटीत आहेत. वादीचे वकीलांनी दाखल केलेल्या न्यायनिवाडयातील बबन अनंतराव नाईक या खटल्यामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, तुर्तातुर्त ताकीदीचे अर्जाचे निर्णयाचे वेळेस मिळकतीचे कब्जेवहिवाटीचे तथ्य हि महत्वाची बाब आहे. तसेच वादींचा मिळकतीतील ताबा कायदेशीर किंवा बेकायदेशीर आहे ही बाब पुराव्याचे वेळेस बघितली जाईल. तसेच **विठ्ठलदास लोटलीकर** या खटल्यामध्ये तुर्तातुर्त मनाई आदेशाचे वेळेस मालकी हक्काची बाब महत्वाची नसून मिळकतीचा ताबा वादीकडे आहे ही बाब कोणत्याही मालकी हक्क कागदपत्रा अन्वये दाखविलेली पाहिजे.

**१८.** वरील विवेचनाचा आढावा घेता सध्य स्थितीला दावा मिळकत वादींच्या नावे असून वादींचे कब्जेवहिवाटीत असल्याचे दाखल असलेल्या कागदपत्रावरुन सिध्द होते. मृत्यूपत्र हे खोटे बनावट असलेबाबत प्रतिवादींनी कोणताही पूरावा आणलेला नाही. वादींनी दावा मिळकत त्यांचे कब्जेवहिवाटीत

असल्याबाबत सकृतदर्शनी पुरावा आणलेला आहे. वादींच्या विरोधात तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश दिल्यास वादींचे पैशाच्या रुपाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादीने दावा मिळकत कब्जेवहिवाटीत असल्याबाबत कोणताही पुरावा आणलेला नाही. त्यामुळे वादी यांनी त्यांचे बाजूने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे. म्हणून मी मुद्दा क्रं.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

मुद्दा क्रं. २ साठी

१९. वादींनी त्यांच्या बाजूने प्रथमदर्शनी केस व न्यायाचा समतोल असल्याचे सिध्द केले आहे. न्यायालयासमोर सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे स्पष्ट होते की, वादी हे वाद मिळकत कब्जेवहिवाटीत असून वाद मिळकतीचे रेकॉर्ड सदरी त्यांची नावे नोंद आहेत. अशा परिस्थितीत वादींच्या बाजूने जर तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश झाला नाही तर वादींचे पैशाच्या रुपाने न भरुन येणार नुकसान होईल. याउलट प्रतिवादींचा फारसा तोटा होईल असे वाटत नाही. एकंदरित प्रतिवादी यांना ताकीद न दिल्यास वादींचे पैशाच्या रुपाने भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे हे वादींनी सिध्द केले आहे. म्हणून मी मुद्दा क्रं. २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

मुद्दा क्रं. ३ साठी -

२०. वादींनी त्यांच्या बाजूने प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द केले आहे. वादींनी दाखल केलेले कागदपत्रावरुन स्पष्ट होते की, म्हाळाप्पा बंडगर यांचे हयातीत वाद मिळकत म्हाळाप्पा बंडगर यांनी मृत्यूपत्राने वादींचे नावे करुन दिलेली आहे व वादी हे वाद मिळकतीत कब्जेवहिवाटीत आहेत. अशा परिस्थितीत वादींच्या बाजूने जर तुर्तातुर्त ताकीद दिली नाही तर वादीला मोठया कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने असल्याचे वादींने सिध्द केले आहे. म्हणून मी मुद्दा क्रं. ३ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

२१. वरील विवेचनाचा विचार करता माझे मते वादींनी त्यांच्या बाजूने तिन्ही मुद्दे प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल व अपरिमित नुकसान या बाबी सिध्द केलेल्या आहेत. परिणामी मी मुद्दा क्रं. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्रं. ४ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादींचा निशाणी ५ चा अर्ज मंजूर करणेत येत आहे. |
| २. | प्रतिवादींनी किंवा त्यांचेमार्फत इतर कोणीही एजंट अथवा त्रयस्थ इसमांनी वादींच्या दावा मिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा होईल अशा पध्दतीने कोणतीही गैरकृती करु नये असा प्रतिवादींचे विरुध्द दावा निकाली काढेपर्यंत तुर्तातुर्त मनाईचा आदेश देणेत येत आहे. |
| ३. | खर्चाची बाब अंतिम निकालाचे वेळी विचारात घेणेत येईल. |

सांगली.
दिनांक -१०/०९/२०१५.

( एम. आर. यादव )
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सांगली.